नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १३९ | Issue - 139 | वार शनिवार दि. ५ ऑक्टोबर २०२४ | Blow- Saterday Date 5 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## छत्तीसगडमध्ये ४० नक्षलवादी ठार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गडचिरोली : छत्तीसगडच्या दंतेवाडा-नारायणपूर सीमावर्ती भागातील दक्षिण अबूझमाडमध्ये शुक्रवारी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ४० नक्षलवादी ठार झाले. रात्री उशिरापर्यंत ही चकमक सुरू होती. घटनास्थळावरून मोठा शस्त्रसाठाही हस्तगत करण्यात आला आहे. अलिकडच्या काळातील ही सर्वांत मोठी कारवाई असून यामुळे माओवादी चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

### अबूझमाडच्या जंगलात मोठ्या घातपाताचा कट उधळला

गडचिरोलीपासून सुमारे अडीचशे किलोमीटर दंतेवाडा आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागात दक्षिण अबूझमाडमध्ये काही नक्षलवादी दबा धरून बसल्याची माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार दोन्ही जिल्ह्यांच्या सुरक्षा यंत्रणांनी संयुक्तपणे शोधमोहीम हाती घेतली होती. त्यावेळी नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला. जवानांनी जोरदार प्रत्युत्तर दिल्यानंतर अनेक तास चकमक झडली. आतापर्यंत ४० नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले असून एके-४७, एसएलआरसह अन्य शस्त्र व साहित्याचा मोठा साठा आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली. सर्व जवान सुरक्षित असल्याची माहिती आहे. या वर्षभरात छत्तीसगडमध्ये तब्बल १९० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले असून ६६९ जणांना अटक करण्यात आली आहे. ६५६ माओवाद्यांनी या काळात आत्मसमर्पण केले आहे.



नक्षलवादाचा नायनाट करण्यासाठी केंद्र सरकारने गेल्या वर्षीपासून आक्रमक भूमिका घेतली आहे. त्या अनुषंगाने नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात गुप्तचरावर आधारित कारवाईसाठी तसेच दुर्गम गावांमध्ये विकासकामे करण्यासाठी नागरी अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी फॉरवर्ड ऑपरेटिंग बेस (एफओबी) उघडण्यास गती दिली आहे. गेल्या वर्षी डिसेंबरपासून ३३ एफओबी स्थापन करण्यात आले आहेत. या माध्यमातून नक्षलवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांना मोठी मदत होत आहे.

अबूझमाड हा नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला असून तेथूनच गडचिरोलीसाठी घातपाती कारवायांचा कट रचला जातो. या पार्श्वभूमीवर या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे गडचिरोलीशी काही संबंध आहेत का, याची चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र अद्याप संबंधित नक्षल्यांचा गडचिरोलीशी संबंध असल्याची माहिती समोर आलेली नसल्याचे गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी सांगितले. या चकमकीनंतर गडचिरोलीमधील सुरक्षा यंत्रणाही सतर्क झाली आहे. नक्षल्यांनी जिल्ह्यात प्रवेश करु नये, यासाठी सुरक्षा यंत्रणा खडा पहारा देत आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाकडून नव्याने तपास करण्याचे निर्देश; पाच सदस्य समितीची केली स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : जगन मोहन रेड्डी मुख्यमंत्री असताना तिरुमला तिरुपती प्रसाद लाडूमध्ये भेसळ करुन प्राण्यांची चरबी वापरण्यात आली. असा खळबळजनक आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला होता. त्यांच्या या आरोपानंतर यावरून वादही निर्माण झाला होता. तसेच याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. दरम्यान, या याचिकेवर आता सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे.

### तिरुपती मंदिर लाडू प्रकरण

सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी नव्याने तपास करण्याचे तसेच या तपासासाठी पाच सदस्यीय समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये दोन सदस्य सीबीआयचे, दोन सदस्य आंध्र प्रदेश पोलिसांचे तर एक सदस्य एफएसएसआयचा



असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच या तपासावर सीबीआयचे संचालक लक्ष ठेवतील, असंही न्यायालयाने सांगितलं आहे. या प्रकरणी राजकीय वाद निर्माण होऊ नये अशी आमची इच्छा आहे, अशी टीप्पणीही न्यायमूर्ती बी.आर.गवई आणि न्यायमूर्ती के.वी. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने केली आहे.

या सुनावणीदरम्यान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सरकारची बाजू मांडली. यावेळी बोलताना, (पान २ वर...)

## थोडक्यात

### वीर सावरकरांच्या बदनामी प्रकरणी पुणे न्यायालयाकडून राहुल गांधींना समन्स

पुणे : लोकसभा विरोधीपक्ष नेते तसेच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना पुणे उच्च न्यायालयाने समन्स बजावले आहेत. तसेच त्यांना २३ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे. सावरकर यांच्यावर राहुल गांधी यांनी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. या प्रकरणी राहुल गांधी यांच्या विरोधात पुणे न्यायालयात मानहानीचा खटला दाखल करण्यात आला असून न्यायालयाने याप्रकरणी काँग्रेस नेत्याला समन्स बजावले आहेत. यापूर्वी नाशिक न्यायालयानेही त्यांना याच प्रकरणात समन्स बजावले आहे. नाशिकच्या अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी दीपाली परिमल कडूसकर यांनी राहुल गांधी यांना २७ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे समन्स (नोटीस) बजावले आहेत. न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, महापुरूष वीर सावरकर यांच्याविरोधात राहुल गांधी यांनी केलेले विधान प्रथमदर्शनी मानहानीकारक असल्याचे दिसते. या खटल्याच्या पुढील तारखेला राहुल गांधी यांना वैयक्तिकरित्या किंवा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत न्यायालयात हजर राहावे लागेल, असे न्यायालयाने म्हटले आहे. दरम्यान, सावरकरांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी मागील वर्षी एप्रिल महिन्यात पुणे न्यायालयात राहुल गांधींच्या विरोधात याचिका दाखल केली होती.

## मंत्रालयात विधानसभा उपाध्यक्षांसह आमदारांच्या जाळ्यांवर उड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पेसा अंतर्गत विविध जिल्ह्यातील रखडलेली भरती प्रक्रिया पूर्ण करा, धनगर समाजाची आदिवासी आरक्षणातील घुसखोरी थांबवून अधिसंख्य पदे भरावीत आदी मागण्यांसाठी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खुद्द विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह चार आदिवासी आमदारांनी मंत्रालयातील संरक्षण जाळीवर उड्या घेतल्या. मुख्यमंत्र्यांविरोधात



घोषणाबाजी करीत आणि पत्रके भिरकावत या आमदारांनी त्यांचा निषेध नोंदवल्याने मोठा गोंधळ उडाला. पोलिसांनी तत्काळ धाव घेत या आमदारांना जाळीवरून सुरक्षितरीत्या बाहेर काढले.

मागील आठवड्यात सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी गेलेल्या आदिवासी आमदारांना ताटकळावे लागले. शुक्रवारी मंत्रिमंडळ बैठकीच्या निमित्ताने हे आमदार पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी मंत्रालयात आले. मात्र, भेट न मिळाल्याने संतप्त झालेले विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, राष्ट्रवादीचे (अजित पवार) (पान २ वर..)

## मजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रॉलीला ट्रकची धडक; १० जणांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मिर्झापूर : उत्तर प्रदेशच्या मिर्झापूर येथे शुक्रवारी मध्यरात्री मजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीचा भीषण अपघात झाला. या अपघातात दहा जण ठार तर तीनजण जखमी आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. मिर्झापूर-वाराणसी सीमेवरील कछावन आणि मिर्झामुराद भागांदरम्यान जीटी रोडवर मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली, असे पोलिस अधीक्षक (मिर्झापूर) अभिनंदन यांनी सांगितले.



भदोही जिल्ह्यात बांधकामाच्या कामावरून परतत असलेल्या १३ मजुरांना घेऊन जात असलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीला चालकाच्या नियंत्रणाबाहेर गेलेल्या ट्रकने मागून धडक दिली, असे एसपी म्हणाले. अपघाताची माहिती मिळताच एसपी आणि इतर वरिष्ठ अधिकारी बचाव कार्यावर लक्ष ठेवण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले होते.

१३ जखमींपैकी १० जणांचा मृत्यू झाला तर इतर तिघांना खखढ-इक्‍ण येथे रुग्णालयात नेण्यात आले, त्यांची प्रकृती चांगली असल्याचे (पान २ वर...)

## तब्बल नऊ वर्षाने परराष्ट्र मंत्री जाणार पाकिस्तानला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताने शुक्रवारी जाहीर केले की परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (डउज) शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानला भेट देणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी ही घोषणा केली. पाकिस्तान यावर्षी डउज परिषदेचे आयोजन करत आहे. पाकिस्तानला भेट देणाऱ्या शेवटच्या भारतीय परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज होत्या, ज्यांनी डिसेंबर २०१५ मध्ये अफगाणिस्तानवरील परिषदेसाठी पाकिस्तानला भेट दिली होती. २०१५ मध्ये सुषमा स्वराज यांनी पाकिस्तानमध्ये ७ -८ डिसेंबर रोजी झालेल्या वार्षिक हार्ट ऑफ एशिया परिषदेत भाग घेतला होता. या कार्यक्रमाला १४ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बँकॉकमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात शांतता करार झाल्यानंतर लगेचच स्वराज यांचा दौरा झाला होता. २०१५ च्या सुरुवातीला काश्मीरमधील अनेक महिन्यांच्या तणावानंतर भारताने ऑगस्टमध्ये उच्चस्तरीय बैठक रद्द केली होती. हार्ट ऑफ एशिया कॉन्फरन्स आशियाई आणि इतर देशांना एकत्र आण्यासाठी आयोजित केली जाते. तालिबान आणि इतर प्रादेशिक दहशतवाद्यांच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील सुरक्षा सहकार्य महत्त्वपूर्ण मानले जात होते.

अफगाणिस्तानवरील हार्ट ऑफ एशिया प्रादेशिक परिषदेच्या निमित्ताने सुषमा स्वराज यांनी आपल्या दौऱ्यात पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांची भेट घेतली. शरीफ यांचे परराष्ट्र व्यवहार सल्लागार सरताज अझीझ यांच्याशीही त्यांनी चर्चा केली. परराष्ट्र सचिव म्हणून कार्यरत असलेले एस. जयशंकर त्यावेळी स्वराज यांच्यासोबत होते. मात्र, शरीफ यांच्या भेटीत भारताचा ध्वज नसल्यामुळे वाद निर्माण झाला होता.

सुषमा स्वराज यांच्या पाकिस्तान दौऱ्यापूर्वी, भारत आणि पाकिस्तानचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि नसीर खान जंजुआ यांची बँकॉकमध्ये भेट झाली. ही बैठक सुमारे चार तास चालली. विशेष म्हणजे, या बैठकीला विद्यमान परराष्ट्र मंत्री आणि तत्कालीन परराष्ट्र सचिव एस. जयशंकर उपस्थित होते. प्रतिनिधींनी दहशतवाद, जम्मू-काश्मीर आणि अनेक महत्त्वाच्या द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा केली.

## मुंबईत पहिली भुयारी मेट्रोचे पंतप्रधानांच्या हस्ते प्रकल्पांचे लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून यावेळी ते मुंबई महानगर प्रदेशातील सुमारे ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करणार आहेत. 'कुलाबा - वांद्रे - सीप्झ भुयारी मेट्रो ३' मार्गिकेतील आरे - बीकेसी अशा १२.५ किमी टप्प्याचे लोकार्पण बीकेसी मेट्रो स्थानकात पंतप्रधानांच्या हस्ते केले जाणार आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याआधी मुंबई महानगर प्रदेशातील विकास कामांच्या लोकार्पणाचा, भूमिपूजनाचा धडाका लावत मतदारांना आकर्षित करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) ३३.५ किमीच्या लांबीच्या 'मेट्रो ३' प्रकल्पातील आरे - बीकेसी टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. आरे - बीकेसी टप्प्याच्या संचलनासाठी एमएमआरसीला मेट्रो आयुक्त, मेट्रो रेल्वे सुरक्षा (सीएमआरएस) यांच्याकडून सुरक्षा प्रमाणपत्र प्राप्त झाले नव्हते.

### सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी व्हायबिलिटी गॅप फंडिंग

### जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय

## कॅबिनेट बैठकीत निर्णयांचा धडाका, एकाच आठवड्यात युती सरकारचे ७१ मोठे निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागण्यापूर्वी सलग एकाच आठवड्यात दोन वेळा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठका घेण्यात आला. सोमवारच्या बैठकीत ३८ निर्णयांवर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर आजच्या बैठकीत ३३ निर्णय घेण्यात आले. एकाच आठवड्यात ७१ निर्णय झाले आहेत. आजच्या बैठकीत जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी व्हायबिलिटी गॅप फंडिंग देण्याचंही ठरलं. प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षाचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय : १. राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ ( महसूल विभाग) २. महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणार (महसूल विभाग) ३. दौंड येथे बहुउद्देशीय सभागृह नाट्यगृहासाठी शासकीय जमीन (महसूल विभाग) ४. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामास मान्यता (जलसंपदा विभाग) ५. टेंभू उपसा सिंचन योजनेस स्व. अनिल भाऊ बाबर यांचे नाव ( जलसंपदा विभाग) ६. पूर्णा नदीवर दहा साखळी बंधाऱ्यांच्या कामांना गती देणार सिल्लोड मधील जमिनीला सिंचन (जलसंपदा विभाग) ७. प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षाचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद (पर्यटन) ८. राज्यातील खेळाडूंसाठी पारितोषिक रक्कम वाढवली (क्रीडा विभाग) ९. राज्यातील आणखी १०४ आयटीआय संस्थांचे नामकरण ( कौशल्य विकास) १०. संत भगवान बाबा ऊसतोड कामगार अपघात विमा योजना राबवणार (सामाजिक न्याय विभाग) ११. लहान जलविद्युत प्रकल्पासाठी बांधा वापरा हस्तांतरण धोरण (जलसंपदा विभाग) १२. कोकण पुणे विभागासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या



( मदत व पुनर्वसन विभाग) १३. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ( वैद्यकीय शिक्षण) १४. राज्यात आरोग्य क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे (वैद्यकीय शिक्षण) १५. जैन समाजासाठी अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (अल्पसंख्याक विकास विभाग) १६. महाराष्ट्र भूजलाशयीन मच्छीमार कल्याणकारी महामंडळ ( पदुम विभाग) १७. आजरा तालुक्यातील वेळवट्टी, गवसे, घाटकरवाडी बंदिस्त पाईपलाईन टाकणार (मृद व जलसंधारण) १८. बंजारा, लमाण तांड्यात ग्रामपंचायतसाठी लोकसंख्येची अट शिथिल (ग्रामविकास विभाग) १९. कागल येथील सागावमध्ये नवीन शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय (वैद्यकीय शिक्षण विभाग) २०. महाराष्ट्र सागरी मच्छीमार कल्याणकारी महामंडळ स्थापन करणार (मत्स्य व्यवसाय विभाग) २१. कुडाळ तालुक्यातील डोंगरेवाडीत साठवण तलाव (मृद व जलसंधारण विभाग) २२. बारी, तेली, हिंदू खाटीक, लोणारी समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळे ( इतर मागासवर्ग विभाग) २३. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना कायमस्वरूपी राबवणार २६०४ कोटीस मान्यता ( मृद व जलसंधारण विभाग) २४. राज्यात हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क स्थापन करणार १ लाख ६० हजार कोटींचे गुंतवणूक अपेक्षित (उद्योग) २५. उच्च तंत्रज्ञानावरील अतिविशाल प्रकल्प योजनेत सुधारणा अधिकाधिक प्रकल्पांना प्रोत्साहन (उद्योग विभाग) २६. राळेगण सिद्धी येथील उपसा सिंचन योजनेचे सक्षमीकरण (मृद व जलसंधारण विभाग) २७. शिरोळ तालुक्यातील गावांमध्ये भूमिगत चर योजना राबवणार (जलसंपदा विभाग) २८. बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांना दहा लाखांपर्यंत अनुदान योजना (अल्पसंख्याक विकास विभाग) २९. सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी व्हायबिलिटी गॅप फंडिंग देणार (विमानचालन विभाग) ३०. वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देणार (सार्वजनिक आरोग्य विभाग) ३१. डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र मधील कर्मचाऱ्यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना (उच्च व तंत्र शिक्षण) ३२. वडाळा सॉल्ट पॅनमधील भूखंड शैक्षणिक कारणांसाठी (महसूल) ३३. रमाई आवास, शबरी आवास योजनेतील घरकूल अनुदानात वाढ. (सामाजिक न्याय)

## संपादकीय....

### निर्णयांचा धडाका

आधी निर्णय, लगेच शासन निर्णय निर्गमित, मग प्रस्ताव मान्यतेचे सोपस्कार अशा महायुती सरकारच्या गतिमान राज्य कारभाराच्या अनोख्या धोरणाची सध्या मंत्रालयात चांगलीच चर्चा रंगलेली आहे. सोमवारी तब्बल ५६ निर्णयांचा धडाका लावणाऱ्या सरकारने शुक्रवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत ३५ निर्णय आणि तब्बल १७१ शासन निर्णय काढताना समाजाच्या विविध घटकांतील मतदार राजाला खूश करण्याचा प्रयत्न केला. कोणत्याही परिस्थितीत विधानसभा पुन्हा जिंकायचीच या इराद्याने महायुती सरकारने गेल्या काही दिवसांपासून समाजातील सर्व घटकांना खूश करण्याचा धडाका लावला आहे. विविध जाती-धर्मीयांसाठी कल्याणकारी महामंडळे, राज्यभरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना त्या त्या विभागातील नेत्यांची नावे, विविध समाज घटकांना सवलती, जमिनी देणाऱ्या निर्णयांची मालिकाच सरकारने सुरू केली आहे. यातील अनेक निर्णयांची मंत्र्यांना मंत्रिमंडळ बैठकीच कल्पना दिली जाते. विशेष म्हणजे मंत्रिमंडळात येणाऱ्या प्रस्तावांची माहिती बैठकीपूर्वी मंत्र्यांना पाठविली जाते. त्यानंतर बैठकीत प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन त्याला मंत्रिमंडळ मान्यात देते. मात्र विद्यामान सरकारमध्ये अनेकदा आधी निर्णय, मग शासन निर्णय आणि शेवटी वित्त, नियोजन, विधि व न्याय अशा सबंधित विभागांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव अशी अनोखी पद्धती सध्या सुरू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयांचे इतिवृत्त मंजुरीची वाट न पाहताच लगेच शासन निर्णय निर्गमित करण्यात आले.

# जागतिक प्राणी दिवस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जागतिक प्राणी दिन हा प्राणी हक्क आणि कल्याणासाठी कृतीचा एक आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक प्राणी दिनाची सुरुवात सायनोलॉजिस्ट हेनरिक झिमरमन यांनी केली होती. त्यांनी २४ मार्च १९२५ रोजी जर्मनीतील बर्लिन येथील स्पोर्ट पॅलेस येथे पहिला जागतिक प्राणी दिन आयोजित केला होता. या पहिल्या कार्यक्रमाला ५००० हून अधिक लोक उपस्थित होते. पर्यावरणशास्त्राचे संरक्षक संत असिसीच्या संत फ्रान्सिस यांच्या मेजवानीच्या दिवसाशी सरेखित करण्यासाठी हा उपक्रम मूलतः ४ ऑक्टोबर रोजी नियोजित होता. मात्र त्या दिवशी स्थळ उपलब्ध नव्हते. त्यानंतर हा कार्यक्रम १९२९ मध्ये पहिल्यांदा ४ ऑक्टोबरला हलविण्यात आला. दरवर्षी झिमरमन यांनी जागतिक प्राणी दिनाच्या प्रचारासाठी अथक परिश्रम घेतले. शेवटी पर्यावरणासोबतच प्राण्यांचेही संरक्षण व्हावे, तसेच लोकांमध्ये प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत व्हावी. यासाठी मे १९३१ मध्ये इटलीतील फ्लोरेन्स येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसच्या पर्यावरण परिषदेमध्ये ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिन म्हणून सार्वत्रिक करण्याचा त्यांचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला आणि ठराव म्हणून स्वीकारण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक प्राणी दिवस' म्हणून ओळखला जातो.

या दिवसाच्या समर्थनार्थ राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह भारतभर दरवर्षी दि. २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. या दरम्यान वन्यजीव सप्ताह- नॅशनल वाइल्डलाईफ वीक साजरा केला जातो. या वर्षी आपण ७० वा वन्यजीव सप्ताह साजरा करत आहोत. वन्यजीव सप्ताह करिता भारतीय वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली आणि भारताच्या वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५२ मध्ये वन्यजीव सप्ताहाची संकल्पना मांडण्यात आली. सुरुवातीला वन्यजीव दिन १९५५ मध्ये साजरा करण्यात आला, तदनंतर १९५७ मध्ये वन्यजीव सप्ताह म्हणून श्रेणी सुधारित करण्यात आला. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. आता या मूळ हेतूचा काळानुसार विस्तार झाला आहे. वन्यजीवांनी मानवी आयुष्यात प्रवेश करण्यामागची कारणे समजावून दिली जात आहेत. खरे तर कोणताही वन्यजीव स्वत:हून माणसांवर हल्ला करत नाही. परंतु त्यांच्या राहण्याच्या जागेवर शेती, रस्ते वा बांधकामाच्या रूपाने होणारे मानवी आक्रमण मर्यादे पलीकडे गेले की ते जंगलाच्या सीमेवरील खेड्यांत घुसून मुख्यत: पोटासाठी गाई गुरे मारतात व त्यातून मानव आणि वन्यजीव असा संघर्ष उद्भवतो. भारतासहित जगातील इतरही पुरातन संस्कृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे मानव आणि वन्यजीवात मैत्री असणे ही संपूर्ण पृथ्वीची गरज आहे, कारण वन्यजीवांखेरीज मानव सुखाने राहूच शकणार नाही. ही जागृती रुजवण्यासाठी भारत सरकारने इंडियन बोर्ड ऑफ वाईल्डलाईफची स्थापना पूर्वीच केली आहे. जंगल सीमेवरील स्थानिकांना याबाबत योग्य माहिती, मार्गदर्शन व सुविधा पुरवावी तसेच वन्यजीवांबद्दल माहिती मिळवून त्यांचा जीवनक्रम समजून घ्यावा; ज्यामुळे त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर होऊ शकतील.

जागतिक प्राणी दिनाच्या चळवळीला नेका स्वेन्स्का, ब्रायन ब्लेस्ड आणि मलानी सी सारख्या अनेक सेलिब्रिटींनी समर्थन दिले आहे. सर्व सृष्टीवर प्रेम करा' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच केले जाते.

वाढत्या लोकसंख्येमुळे पूर्वीची घनदाट जंगल तुटून तिथे गावाची नगरे व नगरांची महानगरे होत असताना भरपूर प्रमाणात जंगल तोड झाली. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. काही पाळीव प्राण्यांना अतिशय चांगले वागवले जाते, तर काहींना दिवसभरात खायलाही मिळत नाही. ही समस्या जगापुढे आणण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव-भटक्या अशा सर्व प्राणिमात्रांचा यांमध्ये समावेश होतो. अर्जेंटिना मध्ये १९०८ पासून हा दिवस २९ एप्रिल रोजी पाळला जातो, ज्याला ब्युनोस आयर्सच्या प्राणी संरक्षण संघटनेचे अध्यक्ष इग्नासिओ लुकास अल्बारासिन यांनी प्रोत्साहन दिले . योगायोगाने १९२६ मध्ये त्याच तारखेला अल्बररासिन मरण पावले, त्यामुळे देशातील प्राण्यांच्या हक्कांच्या चळवळीत अग्रगण्य असलेल्या त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा हा दिवस बनला. २००३ पासून जागतिक प्राणी दिन संयुक्त राष्ट्र स्थित प्राणी कल्याण चॅरिटी, नेचरवॉच फाउंडेशन द्वारे २०२३ च्या उत्सवासाठी लाँच केलेल्या नवीन जागतिक प्राणी दिन वेबसाइटसह समन्वयित केले आहे. बोलिव्हिया, बहामास, चीन आणि कोलंबिया सारख्या अनेक देशांनी जागतिक उत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक कार्यक्रम चालवले आहेत. आज जागतिक प्राणी दिनानिमित्त सर्व प्राणी प्रेमींना हार्दिक शुभेच्छा!



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

## सकल महादेव कोळी समाज बांधवांचा करमाळा तहसील कार्यालयावर हलगीनाद मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सखल महादेव कोळी समाज करमाळा शहर व तालुका यांच्या वतीने करमाळा तहसील कार्यालयावर हलगी नाद मोर्चा काढून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आलेल्या मोर्चाची सुरुवात कानाड गल्ली येथील महर्षी वाल्मिकी मित्र मंडळ समाज मंदिर येथून करण्यात आले व करमाळा शहरातील महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की २५ सप्टेंबर २०२४ पासून महादेव कोळी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्न बाबत सोलापूर येथे समाज बांधव आमरण उपोषणास बसलेले आहेत. महादेव कोळी समाज हा अनुसूचित जाती जमाती या प्रवर्गात समाविष्ट असताना देखील जातीच्या दाखल्याबाबत शासनाने अनेक जाचक अटी घातल्या आहेत. त्या सर्व रद्द करून सुलभ पद्धतीने जातीचे दाखले मिळावे तसेच विविध प्रश्न बाबत हे बांधव प्रामाणिक उपोषण करीत आहेत. सोलापूर येथे चालू असलेल्या कोळी समाजाच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यात आला.

यावेळी सकल महादेव कोळी समाज करमाळा शहर व तालुक्यातील बंदूक बहिणी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी झाले होते.




## मंत्रालयात विधानसभा उपाध्यक्षांसह आमदारांच्या जाळ्यांवर उड्या

(पान १ वरून..) किरण लहामटे (अकोले), भाजप खासदार हेमंत सावरा (पालघर), काँग्रेसचे हिरामण खोसकर (इगतपुरी), बहुजन विकास आघाडीचे आमदार राजेश पाटील (बोईसर) या आमदारांनी मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील संरक्षक जाळीवर उड्या मारून आंदोलन केले. पोलिसांनी जाळीवर उतरलेल्या सर्व आमदारांना सुरक्षितपणे बाहेर काढले. मात्र, या आमदारांनी दुसऱ्या मजल्यावरच ठिय्या आंदोलन सुरू केले. सातव्या मजल्यावर सुरू असलेली मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर मंत्री गिरीश महाजन आणि अब्दुल सत्तार हे मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन दुसऱ्या मजल्यावर आले आणि झिरवाळ यांच्यासह या आमदारांना मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी नेले. या बैठकीदरम्यान मुख्यमंत्र्यांकडून आश्वासन मिळाल्याने या आमदारांनी आंदोलन मागे घेतले. बैठकीविषयीची माहिती माजी खासदार राजेंद्र गावीत यांनी दिली.

## मजुरांना घेऊन जाणाऱ्या ट्रॉलीला ट्रकची धडक; १० जणांचा जागीच मृत्यू

(पान १ वरून..) सांगण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अपघातातील जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी एक्सवर पोस्ट केली आहे.

उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथे झालेला रस्ता अपघात अत्यंत वेदनादायी आहे. यामध्ये ज्यांनी प्राण गमावले त्यांच्या शोकसंतप्त कुटुंबांप्रती माझ्या मनापासून संवेदना. ईश्वर त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. यासोबतच मी सर्व जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो, असं मोदी एक्स पोस्टवर म्हणाले.



## कोराळ–सुपतगाव वाहतूक ठप्प

गुरुवारी दुपारी उमरगा तालुक्यात जोरदार पावसाने झोडपले. या पावसामुळे कोराळ-सुपतगाव रस्त्यावरील ओढ्याला पूर आला, यामुळे कोराळ नजीकच्या पुलावरून सुपतगाव, करवंजी, जेवळी कडे जाणारी वाहतूक ३ तास ठप्प झाली होती. **(छायाचित्र :–सुरज हेंडले )**

## सर्वोच्च न्यायालयाकडून नव्याने तपास करण्याचे निर्देश; पाच सदस्य समितीची केली स्थापना

(पान १ वरून..) हे प्रकरण केंद्रीय पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवावी, अशी आमची मागणी आहे. या आरोपात काही तथ्य असेल तर त्यावर दुर्लक्ष करण चुकीचं आहे. कारण तिरुपती बालाजी यांचे भाविक देशभरात आहेत. एसआयटी सदस्यांकडून तपास करण्यात येत असल्याबद्दल कोणताही आक्षेप नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. तर याचिकाकर्त्याच्यावतीने कपिल सिब्बल यांनी न्यायालयाला बाजू मांडली. यावेळी बोलताना, न्यायालयाने या प्रकरणाच्या तपासाची जबाबदारी विशेष पथकाऐवजी स्वतंत्र तपास यंत्रणेकडे सोपवावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, यापूर्वी याप्रकरणाच्या तपासाठी राज्य सरकारकडून एसआयटी स्थापना करण्यात आली होती. एसआयटीने याप्रकरणाचा तपासही सुरू केला होता. मात्र, याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याने हा तपास तात्पुरता स्थगित करण्यात आला होता. आंध्र प्रदेशचे डीजीपी द्वारका तिरुमला राव यांनी यासंदर्भात माहिती दिली होती. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर पाच सदस्यीय समितीकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येणार आहे.

## जाळ्या नसलेल्या इमारतीतून उड्या मारा; राज ठाकरेंचा शिंदे–फडणवीस सरकारला टोला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे आमदार नरहरी झिरवळ, आ. डॉ. किरण लहामटे, काशीराम पवार, हिरामण खोसकर, राजेश पाटील आणि खासदार हेमंत सावरा यांनी आज मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उडी मारून आंदोलन केले. या आंदोलनावर आता मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी टीका केली आहे. धनगर आरक्षणाचा मुद्दा आणि पेसा भरतीसह विविध मागण्यांसाठी आदिवासी समाजाच्या आमदारांनी आज थेट मंत्रालयात प्रवेश करत तिसऱ्या मजल्यावरून संरक्षक जाळीवर उड्या घेतल्या. या आंदोलनानंतर एकच खळबळ उडाली. विधानसभा उपाध्यक्ष असलेल्या झिरवळ यांना अशापद्धतीने आंदोलन करावे लागले असल्यामुळे विरोदकांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. राज ठाकरे यांनी मात्र या आंदोलनावर आपल्या तिखट शैलीत टीका केली आहे. सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि विधानसभेचे उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवळ यांनी आणि इतर दोन आमदारांनी , आदिवासी समाजवर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी मंत्रालयात संरक्षक जाळीवर उड्या मारून, म्हणे यांनी निषेध नोंदवला. हा कुठला निषेध ?, असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.सत्तेशिवाय राहू शकत नाही, असं म्हणणं शक्य नव्हतं, म्हणून 'जनतेच्या सेवेला सत्ता हवी', म्हणत तुम्हीच आणि तुमच्या सरदाराने सत्तेच्या जाळ्यात उड्या मारल्या होत्यात ना ?, असाही प्रश्न राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टमधून विचारला आहे. राज ठाकरे यांनी एक्सवर टाकलेल्या पोस्टमध्ये पुढे म्हटले, सत्ता आली तरी तुम्ही स्वतःचं सोडून कोणाचंही भलं करू शकत नाही हे नक्की. बरं मुळात तुम्ही सत्ताधारी, त्यात पुन्हा संविधानिक पदावर बसलेले, तुम्ही निषेध कसले नोंदवताय ? आदिवासी जनतेबद्दल खरंच कळवळा असेल तर, आजपर्यंतच्या सर्व सत्ताधाऱ्यांनी, ज्यांनी आदिवासी हे मागासच राहतील हे पाहिलं त्या सगळ्यांनी संरक्षक जाळ्या नसलेल्या इमारतींवरून उड्या मारून प्रायश्चित्त घेतलं पाहिजे.

# निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे बहुउद्देशीय सभागृहाचे उदघाटनानिमित्त पतसंस्थेच्या यशशिखराचा घेतलेला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**संकलन :– राजेंद्र थोरात**

आपण ज्या पेशात व समाजात काम करत आहोत त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही उदात्त भावना डोळ्यासमोर ठेवून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे हित डोक्यासमोर ठेवून साधारण तेवीस वर्षापुर्वी दि.१६ ऑक्टोबर २००० ला दुरगामी विचारसरणीचे शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे यांनी कैलास भारती,बी.वाय. सोनवणे व मनोज निकम यांना बरोबर घेवुन पतसंस्थेची मोठ्या कष्टाने मूहर्तमेढ रोवली.

शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे यांनी आजतगायत नाशिक जिल्हा टी.डी.एफ चे अध्यक्ष व उपाध्यक्ष, नाशिक विभाग टी.डी.एफ संघटनेचे उपाध्यक्ष, एन.डी.एस.टी सोसायटीचे चेअरमन, निफाड तालुका माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष, नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघ फेडरेशनचे सदस्य, निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, नाशिक जिल्हा शारदादेवी पतसंस्थेचे संस्थापक तथा मार्गदर्शक,निफाड तालुका एज्युकेशन संस्थेचे सेवक संचालक, नाशिक जिल्हा शिक्षक कृती समन्वय समितीचे मार्गदर्शक,पिंपळगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक आदी विविध महत्त्वाच्या पदांच्या जबाबदाऱ्या अतिशय व्यवस्थितपणे पार पाडून अनेकांना सहकार्य केलेले असून निफाड माध्यमिक पतसंस्थेचे सुरुवातीच्या काळात एकशे एक सभासदांपासून सुरुवात झाली.तसेच पंचवीस हजार रुपये कर्ज मर्यादेने सुरुवात झालेली संस्था आज सभासदांना वीस लाख दिर्घकर्ज,पन्नास हजार आकस्मित कर्ज देणारी तालुका कार्यक्षेत्र असणारी एकमेव पतसंस्था ठरली आहे.त्याचबरोबर मेंबर वेल्फेअर अंतर्गत संस्थेने सभासदांचा रुपये अठरा लाखाचा अपघात विमा काढलेला असून संस्थेच्या एखाद्या सभासदाचे अकाली निधन झाल्यास रु.दोन लाखापर्यंत कर्ज देखील माफ करण्यात येते.सभासदांच्या आई, वडील, अविवाहीत मुलगा,मुलगी यांच्या मृत्यू समयी अंत्यविधीसाठी पाच हजार रुपयांची दिली जाते. तसेच सभासद अपघातामध्ये गंभीररीत्या जखमी होवुन फॅक्चर झाल्यास दोन हजार रुपयांची मदत संस्थेमार्फत दिली जाते.याव्यतिरिक्त सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव,आदर्श गुणवंत सभासदांचा गुणगौरव, सेवानिवृत्त सभासदांचा यथोचीत सत्कार,सभासदांना भेटवस्तू, सभासदांची विशेष वैद्यकीय आरोग्य तपासणी,संस्थेचा सभासदाचे अकाली निधन झाल्यास कुंटुबियांस संस्थेकडून तातडीची दहा हजार रुपयांची मदतही दिली जाते.असे संस्थेचे सभासदांसाठी विविध स्वरूपाचे नाविन्यपूर्ण उपक्रम असून सध्याच्या परिस्थितीत संस्थेने अंदाजे पंचेचाळीस लाख रुपये खर्च करुन स्वमालकीचे शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे बहुउद्देशिय सभागृह बांधले आहे.खऱ्या अर्थाने इवलेसे रोप लावियेले द्वारी,त्याचा वेलू गेला गगनावरी, मोगला फुलला,मोगरा फुलला या पंक्तीप्रमाणे संस्थेचा प्रगतीचा आलेख हा दिवसेंदिवस उंचावत आहे. संस्थेच्या नूतन सभासगृहाचे उद्घाटन व नामकरण सोहळा रविवार दि.०६/१०/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता गायत्री नगर, पिंपळगाव बसवंत रोड येथे खासदार राजाभाऊ वाजे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्थेचे संचालक खासदार भास्करराव भगरे यांच्या हस्ते तर पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार असून याप्रसंगी विशेष अतिथी म्हणुन माजी आमदार अनिल कदम, सुप्रसिध्द शिवव्याख्याते प्रा. यशवंत गोसावी,निफाडचे माजी नगराध्यक्ष राजाराम शेलार, सरपंच,पिंपळगाव बसवंत चे सरपंच भास्करराव बनकर, न्या. रानडे वि.प्र.मंडळाचे सचिव रतन पाटील वडघुले, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे जनसंपर्क संचालक अंजिक्य वाघ, कृउबा समिती नवी मुंबई चे संचालक जयदत्त होळकर,युवा उद्योजक शंतनू पाटील,निफाड चे सहाय्यक निंबधक कांतीलाल गायकवाड, म.रा.माध्य. शिक्षक संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कानडे,म.रा.माध्य.शिक्षक संघांचे कार्यवाह शालीग्राम भिरुड,जळगाव जिल्हा टि.डी एफ.चे अध्यक्ष आर.एच. बाविस्कर,नाशिक चे शिक्षक नेते बाळासाहेब सुर्यवंशी आदी मान्यवरांच्या विशेष उपस्थित सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे.याप्रसंगी संस्थेचे सर्व सभासद,ठेवीदार,हितचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे संस्थापक शिक्षक नेते शिवाजीराजे निरगुडे, संस्थापक अध्यक्ष कैलास भारती, विद्यमान चेअरमन रामराव बनकर, उपाध्यक्षा सोनाली होळकर, कार्यवाह बाळासाहेब गुंजाळ,संचालक तथा खासदार भास्करराव भगरे,बाळासाहेब सोनवणे,नगरसेवक तथा संचालक साहेबराव बर्डे,किरण जाधव,गणेश महाले,राहुल दवते, भगीरथ सोनवणे,बाळकृष्ण वाजे, संचालिका हेमलता जाधव, स्वि. संचालक विलास दखणे, हेमंत खैरनार यांसह व्यवस्थापक रतन दिवटे व ज्ञानेश्वर धाटबळे आदींनी केले आहे.



**शब्दप्रपंच**
**राहुल दवते,निफाड**
**संचालक– निफाड तालुका माध्यमिक शिक्षण व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था,निफाड**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दुचाकीने धडक दिल्याने एक जण जखमी

सोलापूर (प्रतिनिधी) सायकल वरून भाजीपाला विक्री करिता जात असताना तात्या गणपती येथे दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीजे.३७३३ यावरील चालक साईप्रसाद जागीलम याने दुचाकी वेगात व हयगयीने चालवून फिर्यादी सुनील कृष्णात शहापूरकर (वय-५३,रा.दक्षिण कसबा, लक्ष्मी मार्केट यार्ड) यांना धडक देऊन त्यांच्या डाव्या पायाच्या कमरेचा खुबा फॅक्चर होण्यास कारणीभूत झाला आहे.ही घटना २९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास तात्या गणपती जवळ घडली.

याप्रकरणी सुनील शहापूरकर यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून साईप्रसाद जागीलम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मस्के हे करीत आहेत.

### सिव्हिल चौकातील प्रियंका हॉटेल मधून रक्कम पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) सिव्हिल चौक येथील प्रियंका हॉटेलमध्ये कॉन्टरच्या गल्ल्याच्या शेजारील ड्राव्हर मधील चावी घेऊन गल्ला उघडून गल्ल्यातील ४९ हजारांची रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची फिर्याद साकिब रकीब जकलेकर (वय-२६,रा.सुन्नी मस्जिद जवळ, स्वागत नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १ आक्टोंबर रोजी घडली.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल काळेल हे करीत आहेत.

### घरासमोरून चोरट्याने पळवली दुचाकी

सोलापूर (प्रतिनिधी) घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.बीवाय.७९४१ हि दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २८ व २९ सप्टेंबर दरम्यान शिवगंगा नगर भाग २ नई जिंदगी येथे घडली.याप्रकरणी सैफन रहीम पिरजादे (वय-२९,रा.शिवगंगा नगर भाग २) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

# श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक लमाणी पोषाखासह अलंकार परिधान

## नवरात्र महोत्सव : पारंपारिक कार्यक्रमांसह महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.०४) घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे दुसऱ्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस लमाणी पोषाख परिधान करण्यात आला असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

रुक्मीणी मातेस चिंचपेटी, तनमई मोठा, भोर, झेला, ठुशी, लहान सरी, सोन्या मोत्याचा तोरड्याजोड, मोत्याचा मोठा कंठा, बाजीराव गरसोळी, मन्या मोत्याची पातळजोड, मोत्याचे मंगळसूत्र, रूळ जोड, पैंजण जोड, लमाणी नथ, कर्णफुले जोड, पुतळ्याच्या माळा, तारा मंडळ इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच श्री विठ्ठलास देखील नेहमी प्रमाणे सोने मुकुट, कौस्तुक मणी, मोत्याचा चुरा, दंड पेल्याचा मोठा जोड, हिऱ्यांचा कंगण जोड, एक पदरी मोत्याची कंठी, लहान-मोठा शिरपेच, मत्सजोड, हायकोल, पुतळ्यांची व मोहरांची माळ, एकदाणी, तोडेजोड, तीन पदरी तुळशी माळ इत्यादी पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

तसेच सत्यभामादेवीला नक्षीटोप, जप्याच्या माळा, जवेच्या माळा, जवमणी पदक, पुतळ्याची माळ तसेक राधिकामातेला सिध्देश्वर टोप, हायकोल, चिंचपेटी तांबडी, मोहरांची माळ, जव्याची माळ परिधान करण्यात आली. तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आला आहे.

प्रतिवर्षीप्रमाणे रूक्मिणी मातेस पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. सदरचे अलंकार पाहण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. तसेच सभामंडपातील पारंपारिक कार्यक्रमा शिवाय महिला भजनी मंडळाच्या भजन सेवेने मंदिरात भक्तीमय वातावरण झालेले आहे. नवरात्र उत्सवातील भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिरात पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.





## निफाड नगरपंचायत माझी वसुंधरा अभियानात विभागात द्वितीय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : माझी वसुंधरा अभियानाच्या चौथ्या टप्प्यात निफाड नगरपंचायतने नाशिक विभागात द्वितीय क्रमांक पटकावला असून महाराष्ट्रात विसावा क्रमांक राखत पन्नास लाखांचे बक्षीस जिंकले आहे.

राज्य शासनाच्या वतीने

**नगरपंचायतला पन्नास लाखांचे बक्षीस तर राज्यात विसावा क्रमांक**

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन ऑक्टोबर दोन हजार वीस पासून माजी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे, शहरी तथा ग्रामीण अशा दोन्ही गटात निसर्गाच्या पंचतत्वावर आधारित उपक्रमांचा यात समावेश आहे, या अभियानाच्या चौथ्या टप्प्यात यावर्षी निफाड नगरपंचायतने दुसरा क्रमांक पटकावला, निफाड नगरपंचायतने सलग चौथ्या वर्षीही या अभियानात चांगली कामगिरी केली असून मागील वर्षी अभियानात विभागात तिसरा क्रमांक होता. नगरपंचायत चे मुख्याधिकारी अमोल चौधरी यांच्यासह या अभियानासाठी स्वच्छता व पाणीपुरवठा अभियंता व नोडल अधिकारी भाग्यश्री सोनवणे, स्वच्छता निरीक्षक विनोद त्रिभुवन, शरद काकुळते, प्रवीण पठाडे, सुनील गांगुर्डे यांचे सहकार्य लाभले तसेच शहरातील शाळा महाविद्यालय व शैक्षणिक संस्था यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री कबड्डी संघ विभागात दुसरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिध/गोदिंया : जिल्ह्यातील नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या चमुने वयोगट १४ हा संघ विभागीयस्तरिय कबड्डी खेळात द्वितीय क्रमांक पटकवला आहे. याच शाळेतील एक विद्यार्थ्यांची राज्यस्तर खेळण्यासाठी निवड चाचणीद्वारे पालघर येथे खेळणार आहे.

सदर कबड्डी सांघिक खेळ हे क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी विभागीयस्तरीय कबड्डी हा वर्धा येथे संपन्न झाल्या. वयोगट १४ मध्ये कबड्डी मुले असे खेळ क्रीडा संकुल वर्धा येथील क्रीडांगणावर निवड करण्यात आली. यामध्ये विभागीत कबड्डी वयोगट १४, १७ व १९ असे होते. यामध्ये अनुसूचित

**विभागीयस्तरीय कबड्डीत द्वितीय क्रमांक**

जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री या चमुने सहभाग घेऊन वयोगट विभागात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. यामध्ये सहभागी विद्यार्थी प्रशांत रक्षा, हेमंत उईके, सागर कोहरे, आदित्य कोकोडे, आदित्य जमदाळ, आर्यन सोनवणे, गौरव जमदाळ, धृप लटये आदी खेळाडू तसेच मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी उत्तम प्रशिक्षण देत कबड्डी खेळाचे नवनवीन टिप्स दिले. चांगले सराव करवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. विजयाच्या यशाबद्दल समाज कल्याण सहायक आयुक्त विनोद मोहतूरे, शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठ्ठले यांनी अभिनंदन करत शाळेचे शिक्षक कार्तिक शहारे, प्रदिप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण, तुषार महाजन आदी शाळेतील कर्मचारी व बाह्य स्त्रोत कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### हेमंत उईके याची राज्यस्तर निवड चाचणी

सदर शाळेचा विद्यार्थी हेमंत संजय उईके या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय कबड्डी खेळण्यासाठी चाचणी घेण्यात आली. त्या चाचणीमध्ये हेमंत हा यशस्वी झाला. विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांना पालघर येथे जाण्याचे निवडपत्र मिळाले असून राज्यस्तरीय चाचणीसाठी पात्र ठरला आहे.




## श्री माणकेश्वर वाचनालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : श्री माणकेश्वर वाचनालय निफाड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार व वाचनालयाचे संचालक राजेंद्र खालकर यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष मधुकर शेलार, सुहास सुरळीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले ,यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉक्टर मेघा जंगम, हिशोब तपासणी, दत्तात्रय उगावकर ,संचालक सुहास सुरळीकर, सुनील चिखले, ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल विद्या बेंद्रे ,लेखनिक नंदकुमार पुंड , वाचनालयाचे कर्मचारी वर्ग वाचक यावेळी उपस्थित होते,



## टाकळीवाडी मध्ये दुर्गामाता प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ पत्रकार/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे दुर्गामाता प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात करण्यात आली.

भक्तिमय वातावरणात दुर्गामाता कुंभार वाड्यातून आणण्यात आली. चर्मकार समाज व गावातील शिवाजी चौक येथे प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहात करण्यात आली. हलगीच्या तालावर सर्वजण बेधुंद झाले होते.अनेक लहान बालके यामध्ये मोठ्या आनंदाने सहभागी झाले होते.

## मतदारसंघ सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार शिंदे कुटुंबीय कटिबद्ध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/लोहा : लोहा येथे काल दि. ४ ऑक्टोबर रोजी सामाजिक कार्यकर्त्या आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते लोहा शहर व तालुक्यातील सा. बां. विभाग नांदेड अंतर्गत विविध ९० कोटी रुपये विविध विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा थाटात संपन्न झाला आहे.

लोहासार्वजनिकबांधकाम उपविभागीय कार्यालय परिसरात दुपारी जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून गंगाधर सावकार सूर्यवंशी, प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे,संचालक तथा चेअरमन से.सो.हाळद रोहित पा शिंदे,तहसीलदार विठ्ठल परळीकर,उपसभापती श्याम अण्णा पवार, उपसभापती अण्णासाहेब पवार, सरपंच पुंडलिक पाटील बोरगावकर,बालाजी इसादकर, इंजि. सोमवंशी, समन्वय समिती सदस्य सिद्धू पाटील वडजे, संचालक विश्वम्भर पवार, भाऊराव कंधारे ,ज्ञानेश्वर पाटील पवार,माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळ राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुकाध्यक्ष प्रभाकर पवार,सरपंच बंडू पा मस्किकर,सरपंच मारोती सोनवळे,मा सरपंच शंकर माने संचालक सुधाकर सातपुते,नागेश हिलाल, फयाज शेख, प्रसाद जाधव,सतीश कराळे सह प्रमुख उपस्थिती होते.

**आमदार श्यामसुंदर शिंदे दूरदृष्टीचे लोकनेते : आशाताई शिंदे**

**गेल्या ७५वर्षांच्या काळात कोणत्याही पुढाऱ्याने मतदारसंघात एवढी मोठी विकास कामे केलेली नसून येथील काही पुढारी हे सोसिअल मीडियावरील हिरो आहेत, आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या सारख्या विकासाभिमुख नेत्रतवावर कोणीही टीका केलेली मी यापुढे कदापि सहन करणार नसून विकासाच्या मुद्यावर मतदार संघातील सुजाण जनता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी आम्हाला निवडून देतील याचा मला ठाम विश्वास असल्याचे सभापती विक्रांत दादा शिंदे यांनी बोलताना सांगितले.**

यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की,आमदार श्यामसुंदर शिंदे साहेबांचे स्वप्न आहे की मतदारसंघात सिंचनाची सोय झाली पाहिजे. जगाचा पोशिंदा शेतकरी राजा जगला पाहिजे यासाठी आमदार शिंदे यांनी मतदारसंघात २४ सिंचन तलावला मंजुरी मिळवून आणली आहे, आमदार शिंदे साहेब हे विकासाभिमुख नेत्रत्व असून आमदार साहेबांना दूरदृष्टी असल्यामुळेच लोहा शहरात व कलंबर आणि सावरगाव परिसरात ९० कोटी रुपयाची न भूतो न भविष्य अशी कामे झाली असून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कदापि कमी पडणार नसून मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार शिंदे कुटुंबीय सदैव कटिबद्ध असल्याचे आशाताई ताई शिंदे यांनी बोलताना सांगितले,यावेळी मोठया संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी, महिला भगिनीं, अधिकार उपस्थित होते.

**सातारा येथील भिमाईभूमीला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवलेंनी दिली भेट** — **केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले**

# माता भीमाबाई आंबेडकरांच्या स्मारकातील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा / मुंबई : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या माता भीमाबाई आंबेडकरांच्या सातारा येथील भिमाईभुमी स्मारक उभारणीत निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी लवकरच आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून लवकर भिमाई भूमीत महामाता भीमाबाई अंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.

आज सातारा येथील भीमाई भूमीला ना.रामदास आठवले यांनी सपत्नीक भेट दिली यावेळी भीमाईभूमी चे संरक्षण



करून माता भीमाबाई आंबेडकरांच्या स्मारकासाठी अनेक वर्षे प्रयत्नशील असणारे साहित्यिक पार्थ पोळके यांच्या नेतृत्वात भीमाई स्मारकासाठी सर्वतोपरी आपण सहकार्य करणार असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

सातारा येथे १८९६ साली माता भीमाई अंबेडकर यांचे निधन झाले. त्यांचा अंत्यविधी सातारा येथे करण्यात आला.त्याच ठिकाणी माता भीमाबाई यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. हेच स्मारक स्थळ भिमाई भूमी म्हणून राज्यभरात सुप्रसिद्ध आहे.आज या भिमाई भूमीला ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन महामाता भिमाई चे स्मारक लवकर उभारण्यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले. यावेळी रिपब्लीकन पक्षाचे महाराष्ट्र अध्यक्ष राजा सरवदे;सातारा जिल्हा अध्यक्ष अशोक गायकवाड; अण्णा वायदंडे; उत्तर महाराष्ट्राचे नेते रमेश मकासरे; सौ. लक्ष्मी मकासरे; दयाळ बहादुर: आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात

### बियाणे, औषधे व खते यासाठी महा डीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान अन्नधान्य पिके व खाद्य तेल अभियान गळीतधान्य पिके सन २०२४-२५ अंतर्गत रब्बी हंगामात पिके प्रात्यक्षीके तसेच प्रमाणित बियाणे वितरण या बाबींचे नियोजन करण्यात आलेले आहे. या करीता चालू वर्षी हरभरा, गहू या पिकाचे महा डीबीटी पोर्टलवर शेतकरी योजना या शिर्षकाखाली बियाणे घटकाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पिके प्रात्यक्षीके ही बाब शेतकरी गटामार्फत राबविले जाणार आहेत. पिक प्रात्यक्षीकासाठी एका शेतकऱ्यांस ४० आर (१ एकर) क्षेत्र मर्यादेत निविष्ठा स्वरूपात अनुदान उपलब्ध करून दिले जाणार आहे. प्रमाणीत बियाणे वितरणासाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाण्यांचा २ हेक्टर मर्यादेत लाभ देय असणार आहे. यानिविष्ठांचा पुरवठा करण्याकरीता लाभार्थींची निवड महा डीबीटी पोर्टलवर दि.६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत बियाणे, औषधे व खते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी ारहरवलीं. ारहरीरिहीर.सीं.ळप या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

### भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणास स्क्रू ड्रायव्हरने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणास स्क्रू ड्रायव्हरने छातीवर,पोटावर मारून जखमी केल्याची घटना २ ऑक्टोंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास कोनापुरे चाळ येथे घडली.याप्रकरणी रवी सिद्राम बेरे (वय-३२-,रा.रेल्वे लाईन,कोनापुरे चाळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सचिन यल्लाप्पा गोण्याल (रा.कोनापुरे चाळ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे वरील ठिकाणी त्यांच्या मुलीला शिकवणीला सोडून दुचाकी मोकळ्या जागेत लावून घराकडे जात असताना राजू गोरे,अजय गोरे,निकिता गोण्याल व सचिन गोण्याल यांच्यात घरगुती कारणावरून भांडणे सुरू होती.त्यावेळी फिर्यादी भांडण सोडवण्यासाठी गेले असता,त्यांना सचिन याने मागून पकडून हातातील स्क्रू ड्रायव्हरने कानास,छातीवर,पोटावर मारून जखमी करत शिवीगाळ व दमदाटी केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मनोहर हे करीत आहेत.

# जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची निविदा प्रक्रिया त्वरित राबवावी

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील; पालकमंत्र्यांकडून जिल्हा नियोजन समितीच्या खर्चाचा विभागनिहाय सविस्तर आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (कमलाकर सोनकांबळे) : जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ मध्ये सर्वसाधारण ७०२ कोटी, अनुचित जाती उपयोजना १५१ कोटी व आदिवासी उपयोजना साठी ४ कोटी २८ लाख असे एकूण ८५७ कोटी २८ लाख निधी मंजूर आहे. समितीला ३३३ कोटी २७ लाखाची तरतूद प्राप्त झालेली असून या अंतर्गत ३२३ कोटी ५५ लाखाची प्रशासकीय मंजूर देण्यात आलेल्या आहेत. तरी प्रशासकीय मंजुरी प्राप्त असलेल्या कामांची निविदा प्रक्रिया विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहितेपूर्वी राबवावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

### विविध विभागाची तरतूद

**जिल्हा वार्षिक योजना सन २४-२५ अंतर्गत कृषी व संलग्न सेवा ५१ कोटी, ग्राम विकास ६१ कोटी, नागरी क्षेत्राचा विकास १२५ कोटी, पाटबंधारे व पुर नियंत्रण ६३ कोटी, ऊर्जा विकास ५६ कोटी ४० लाख, रस्ते विकास ७६ कोटी, सामान्य शिक्षण ४२ कोटी, आरोग्य क्षेत्र ६२.६५ कोटी, तीर्थक्षेत्र, पर्यटन, गड किल्ले ४३.७५ कोटी, महिला बाल विकास २०.८६ कोटी व्यायामशाळा व क्रीडांगण विकास ७ कोटी अशा महत्त्वाच्या क्षेत्रासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.**



नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री श्री. पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त शितल उगले-तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहायक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते

पालकमंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की विधानसभा निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता लवकरच लागण्याची शक्यता असल्याने जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी निविदा प्रक्रिया त्वरित करून शक्य असेल तर कामांचे कार्यारंभ आदेशही वितरित करावेत. जिल्हा वार्षिक योजनेच्या एकूण ८५७ कोटी २८ लाखाच्या मंजूर निधीतून सर्वसाधारण योजनेसाठी ३१८ अनुसूचित जाती उपाय योजनेसाठी ४. ०८ कोटी आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी १.१७ कोटी असे एकूण ३२३ कोटी ५५ लाखाच्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता समितीने प्रदान केलेली आहे. त्यामुळे ही कामे निविदा प्रक्रिया पर्यंत वेळेत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी निर्देशित केले.

यावेळी पालकमंत्री श्री. पाटील यांनी जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभाग, महापालिका, पोलीस विभाग, समाज कल्याण विभाग या विभागांचा मंजूर निधी, प्राप्त तरतूद व झालेल्या खर्चाचा सविस्तर आढावा घेऊन जास्तीत जास्त निधी वेळेत खर्च करण्याच्या सूचना केल्या. वितरित तरतूद ही १४९ कोटी ३० लाख असून झालेला खर्च ८४ कोटी ९ हजार इतका आहे. खर्चाची टक्केवारी ही फक्त २५ टक असून ही टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना २०२४ २५ अंतर्गत मंजूर निधी, प्राप्त निधी, प्रशासकीय मान्यता व झालेला खर्च याविषयी सविस्तर माहिती देऊन विधानसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहितेपूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची निविदा प्रक्रिया करण्यासाठी प्रशासन प्रयत्न करेल असे सांगितले.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये १७९ प्रकरणे निकाली ८ कोटी २१ लाख ८९ हजार रुपयांची तडजोड शुल्क वसूल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : तालुका विधी सेवा समितीच्यावतीने जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीमध्ये १७९ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली आहेत. या प्रकरणामध्ये एकूण ८ कोटी २१ लाख ८९ हजार ९११ रुपयांची तडजोड झाली असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डी.एन. सुरवसे यांनी दिली.



या लोकअदालतीसाठी एकुण ६ पॅनलची व १ नियमित न्यायालयाचे व्यवस्था करण्यात आली होती. जिल्हा न्यायाधीश श्री. एस. बी. देसाई, न्यायाधीश श्री. ए. ए. खंडाळे, न्यायाधीश श्री. एन. एस. बुद्रुक, न्यायाधीश श्री. एस. एस. चोपडा, न्यायाधीश श्रीमती एस. एस. राउळ, न्यायाधीश श्रीमती पी. आर. पाटील, न्यायाधीश श्रीमती एस. ए. साळुंखे यांनी काम पाहिले. सदरची लोकअदालत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. त्यासाठी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश श्री. डी. एन. सुरवसे, न्यायाधीश श्रीमती एस. एस पाखले यांनी वेळोवेळी बैठका घेवुन, पाठपुरावा करुन संपन्न केली. या लोकअदालतीस विधीज्ञ, बँक कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी, महावितरणचे अधिकारी व पक्षकार मोठया संख्येने उपस्थित होते.

## मनसेच्या वतीने रविवारी आदर्श शिक्षकांचा सन्मान; शालिनीताई ठाकरे यांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नवनिर्माण सेनेच्या वतीने शिक्षक सेनेचे वतीने राज्यातील शिक्षकांचा सन्मान दि.६ रविवारी मोरारजी कांची सभागृहामध्ये करण्यात येणार आहे या कार्यक्रमासाठी मनसेचे सरचिटणीस शालिनीताई ठाकरे उपस्थित राहणार असल्याची मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी त्यांनी दिली.



पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे उमेदवार आणि पंढरपूर मध्ये काही दिवसापूर्वी डॉक्टर व वकील यांचाही सन्मान करण्यात आला आहे.

आता राज्यातील ३२ शिक्षकांचा सन्मान करण्यात येणार दिनांक सहा ऑक्टोबर रोजी मोरारजी कांची सभागृहामध्ये करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मनसेचे सरचिटणीस मीनल ताई ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत. मनसेचे शिक्षक आघाडीचे अध्यक्ष संजय चित्रे. पुणे महिला आघाडीचे अध्यक्ष अनिता आगरकर तसेच राजा चौगुले आधी जण उपस्थित राहणार आहेत

# तहसिल कार्यालय शहराबाहेर हलविण्याच्या प्रक्रियेला वंचित बहुजन आघाडीचा विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/प्रतिनिधी : आज करमाळा या ठिकाणी वंचित बहुजन आघाडी करमाळा शहर व ग्रामीण भागाच्या वतीने तहसील कार्यालय शहराबाहेर हलविण्याच्या प्रक्रियेला विरोध म्हणून मौलाली माळ याठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले जर प्रशासकीय कार्यालये शहराबाहेर गेले तर ते सर्व सामान्य नागरिकांना बराच त्रास सहन करावा लागणार आहे आजची परिस्थिती पाहिली तर ब्रिटिश कालीन तहसील कार्यालय सुस्थितीत



आहे तरीही नवीन तहसील कार्यालय शहराबाहेर हलविण्याचा घाट घातला आहे म्हणून आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओव्हळ तालुका उपाध्यक्ष अजय पवळ शहराध्यक्ष विशाल लोंढे शहर उपाध्यक्ष यशवंत कांबळे उपाध्यक्ष जितेश रणबागुल ता संघटक विनोद धेंडे युवा तालुका युवा जिल्हा उपाध्यक्ष आनंद पवळ उपाध्यक्ष संभाजी कांबळे महेंद्र जगदाळे प्रविण कांबळे शुभम देडगे संतोष पवळ शैलेश कांबळे भैय्या पवार बंटी कांबळे युवा नेते निलेश कांबळे सचिन घोडके मदारी समाजाचे अध्यक्ष उम्मर मदारी विलास ओव्हळ अशोक ओव्हळ मधुकर लावंड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## पळसदेव येथे मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील प्रत्येक नागरिकांच्या दृष्टी आरोग्याचा विचार करून प्रवीण भैय्या माने मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर पळसदेव गावी संपन्न झाले. पळसदेव आजूबाजूच्या गावातील असंख्य नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपली मोफत नेत्र तपासणी करून घेतली.

सकाळी दहा वाजता माजी बांधकाम व आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे प्रविण माने यांच्या शुभहस्ते या शिबिराच्या उदघाटन पार पडले. निलेश रंधवे, अमरसिंह मारकड, तुषार चव्हाण, अमोल डोंगरे, छगन बनसुडे, दीपक सातव, देविदास लावंड, अंकुश दोरकर व अक्षय भोसले यांनी या शिबिराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने छायाताई पडसळकर, वामनतात्या वीर, किरण लावंड, राजाराम बनसोडे, प्रसाद जगताप, सतीश मोरे, बबन बनसोडे, अशोक डोंगरे, रोहिदास गेंड, सोमनाथ तनपुरे, संदेश गायकवाड, निसार तांबोळी, रोहन लावंड, सुहास माने, अभय गायकवाड, अंबादास भिसे, प्रविण साळुंखे, गुलाब शिंदे, नामदेव पवार, डॉ. शरद शिर्के, देविदास सूर्यवंशी, बापूराव साळवे, यावेळी उपस्थित होते.




**नळदुर्ग या ऐतिहासिक शहरात दुर्मिळ क्षणाचा इतिहास होणार** | **अन्न व पाण्याचा त्याग एकाच आसनावर १० दिवस अनुष्ठान**

# नळदुर्ग येथे बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज यांच्या छातीवर करण्यात आली घट स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

शारदीय नवरात्र महोत्सव खुप मोठ्या प्रमाणात सुरु झाला आसुन आज पासुन विजया दशमी पर्यंत पुर्ण १० दिवस एकाच आसनामध्ये नळदुर्ग या ऐतिहासिक नगरीत इतिहास बनणार बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज यांच्या छातीवर १० दिवस घट स्थापना झाली आसुन दिनांक १२ अक्टोबर २०२४ पर्यंत अनुष्ठान करणार आहेत.





नळदुर्ग येथे अंबाबाई मंदिराच्या समोर सर्वात मोठा व लोकप्रिय भक्तासाठी दुर्मिळ हा अनुष्ठान आसणार आहे .

नळदुर्ग व परिसरातील नागरिकांनी या अनुष्ठान करण्यात येणार आहे यावेळी ५१ हजार रुद्राक्षाचे वाटप करण्यात येणार आहे . जनकल्याणासाठी महेश्वरानंद महाराजानी आशा प्रकारे ठिक ठिकाणी अनुष्ठान केले आहेत आज नळदुर्ग ऐतिहासिक शहरात अनुष्ठान होत आहे ही नळदुर्गकरांसाठी व परिसरातील भक्तासाठी पवित्र आणी अस्मरणीय क्षण आहे हा क्षण दुर्मिळ आसणार आहे . या क्षणाचा अशिर्वाद ही घ्या आणि या क्षणाचे साक्षीदार व्हा या अनुष्ठाना मुळे नळदुर्ग नगरी परत पवित्र भुमी दिसणार आहे . आज पहिली माळ आहे महिला भक्ताची खुप मोठया प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केली होती.

आंबाबाई देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष रमेश भानुदासराव जाधव सावकार व पापा गायकवाड पत्रकार गावातील प्रतिष्ठीत नागरीका सह ट्रस्टीचे सर्व सदस्यानी भक्ताची कसली ही हेळसांड होऊ नये म्हणून खुप चांगल्या पद्धतीने नियोजन केले आहे शिवाय आंबाबाई मंदिरावर खुप आकर्षक आणी रोशनाई करण्यात आली आहे शिवाय या परिसरात दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे .सर्व भक्तानी या क्षणाचा आनंद ही घ्यावा आसे आवाहन करण्यात आले आहे .

## घटस्थापनेचे औचित्य साधुन सुतार परिवाराने केली आई जगदंबेची प्रतिष्ठापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : घटस्थापनेचे औचित्य साधुन सुतार कमलाकर सुतार व परिवाराने आई जगदंबेची प्रतिष्ठापना करून भक्तांना महाप्रसादाचे वाटप केले.



लक्ष्मी एक्का कूल घोळसगाव व विश्वकर्मा फर्निचर नळदुर्ग उद्योजक श्री कमलाकर सुतार यांच्यातर्फे घोळसगाव मधील अंबाबाई मंदिरास भवानी मातेच्या मूर्ती प्रतिष्ठापना आज घटस्थापनेच्या अवचित साधून भवानी मातेचा प्राणप्रतिष्ठापना अतिशय उत्साहात साजरा करण्यात आले गावातील सर्व बहुसंख्य भवानी भक्त गण उपस्थित होते काल व पर्वा दोन दिवस रात्रभर भजन व जागरण गोंधळ करण्यात आले आज सकाळी पहाटे पाच वाजल्यापासून विधी कार्यक्रम सुरुवात करण्यात आले होतें . तसेच कमलाकर सुतार यांच्या घरापासून ढोल व ताशांच्या गजरात गावभर भवानी मातेच्या नवीन मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली . गावातील हजारो माता भगिनी व सुवासिनी महिला वर्ग कुंभ घेऊन उपस्थित होत्या तसेच युवकवर्गांनी तुळजापूरहून आणलेली ज्योत सुद्धा मिरवणुकी सोबत घेऊन गावकऱ्यांना ज्योत व भवानी मातेचे मूर्तीचे दर्शन करण्यात आले तसेच भवानी मातेच्या मंदिरातच आज गुरुवारी देवी मातेचे सुद्धा पूजन करण्यात आले. कमलाकर सुतार यांच्याकडून महाप्रसादाची सोय सुद्धा केली होती सर्व भक्तांनी महाप्रसादाची आस्वाद घेतले कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती युवक वर्ग तसेच महिला माता-भगिनी देखील सहकार्य केले श्री भवानी मातेचे प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम अगदी आनंदी उत्साहाने साजरा करण्यात आले.